ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

## एक दिवसीय परिसंवाद : Happy Five Days

### अहवाल

मंगळवार, दि. ०५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष आणि महिला विकास कक्ष (WDC) यांच्या संयुक्त विद्यमाने **'Happy Five Days'** या विषयावर एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादाची उद्दिष्ट्ये विद्यार्थिनींना मासिक पाळीविषयी योग्य व वैज्ञानिक माहिती देणे, मासिक पाळीशी संबंधित गैरसमज व संकोच दूर करणे, आरोग्य, स्वच्छता व पोषण याबाबत जागरूकता निर्माण करणे, विद्यार्थिनींचा आत्मविश्वास व आत्मसन्मान वाढवणे, मासिक पाळीकडे नैसर्गिक व सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे ही होती. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शिका म्हणून डॉ. अश्विनी ओव्हाळ या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संतोष गायकवाड यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्ष समन्वयक डॉ. सीमा परटोले यांनी केले.

प्रमुख मार्गदर्शिका डॉ. अश्विनी ओव्हाळ यांनी मासिक पाळी म्हणजे काय? मासिक पाळी दरम्यान स्वच्छतेचे महत्त्व व योग्य पद्धती, सॅनिटरी पॅड, कप, टॅम्पॉन यांची माहिती व सुरक्षित वापर, मासिक पाळीविषयीचे गैरसमज व अंधश्रद्धा दूर करणे आणि मासिक पाळीदरम्यान मानसिक आरोग्य व भावनिक बदल याबाबत सर्व विद्यार्थिनी व महिला प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थिनीं आणि महिला प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या शंकांचे निरसन केले. सदर परिसंवादास महाविद्यालयातील ६३ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

हा परिसंवाद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिल सिंह, उपप्राचार्य डॉ. एस. गायकवाड, IQAC समन्वयक प्रो. डॉ. एस. वाघमोडे, WDC समन्वयक डॉ. सीमा परटोले, WDC सदस्य डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. निशीगंधा जगे, प्रा. अर्चना घनघाव, प्रा. सरला कातकाडे, प्रा. स्वाती फर्डे आणि प्रा. मोनिका बांगर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.स्वाती जाधव यांनी केले. प्रा. निशिगंधा जगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.